**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये सूचनेसह कलम १५४ अन्वये निदेश.
- वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीचे विनियम ४(ii) मधील खंड (A) मधील प्रस्तावित फेरबदलाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**क्रमांक :- टिपीबी-४३२३/प्र.क्र.१३९/२०२३/नवि-११**
**दिनांक** :- २०/०४/२०२६.

**शासन निर्णय** : सोबतची सूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( निर्मलकुमार पं. चौधरी )**
**उप सचिव महाराष्ट्र शासन**

प्रत -:

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. अप्पर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

(१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(३) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई, (१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.

२/- सदर सूचना शासनाच्या दिनांक १३.९.२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालीलप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२. |
| २) | जाहिरात कोणत्या दिनांकास द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३) | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

- Notice under section 37(1AA) read with directives under section 154 of the said Act.
- Proposed modification in Clause (A) of Regulation 4(ii) of Development Control Regulations for Bandra-Kurla Complex Notified Area under section 37(1AA) of the said Act.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
Mantralaya, Mumbai 400 032.
**Date :-** 20/04/2026.

## NOTICE

**No. TPB-4323/C.R.139/2023/UD-11**

Whereas, the Government in the Urban Development, Public Health and Housing Department vide Notification No. BKR 1177/262/UD-5, dated 7th March, 1977 has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974(Mah.IV of 1975) to be the Special Planning Authority (hereafter referred to as "the Authority") for the Bandra-Kurla Complex Notified Area (hereafter referred to by its acronym as "BKC") under clause (C) of sub-section (1) of section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereafter referred to as "the said Act")

And whereas, in exercise of its powers under sub-section(1) of section 115 as substituted by subsection (3) of section 40 of the said Act, the Government in the Urban Development, Public Health and Housing Department vide Notification No. BKR 1177/262/UD-5, dated 9th April, 1979 approved the Planning Proposals submitted by the Authority for the development of lands in the Bandra-Kurla Complex Notified Area together with the Bandra-Kurla Complex Notified Area Development Control Regulations, 1979 (hereafter referred to as " the said Regulation") ;

And whereas, in exercise of its powers under sub-section (2) of section 37 of the said Act, the Government of Maharashtra vide Notification No.TPB-4307/2594/2617/CR-65/2008/UD-11, dated 2nd May,2008 sanctioned the modification in Regulation 4(ii) of the said Regulation regarding increase in Floor Space Index(FSI) from 2.00 to 4.00 for Commercial purposes and from 1.50 to 3.00 for Residential purposes in 'G' Block of BKC;

And whereas, in exercise of its powers under sub-section (2) of section 37 of the said Act, the Government of Maharashtra vide Notification No.TPB-4308/3531/2617/CR-29/2009/UD-11, dated 31st August, 2009 sanctioned the modification in Regulation 4(ii) of the said Regulation regarding increase in FSI from 2.00 to 4.00 for Commercial purposes and from 1.50 to 3.00 for Residential purposes in 'E' Block of BKC except areas under CRZ for which the sanctioned DCR as on 19/02/1991 are applicable;

And whereas, in exercise of its powers under sub-section (2) of section 37 of the said Act, the Government of Maharashtra vide Notification No.TPB-4313/244/CR-

158/13/UD-11, dated 23rd August,2015 further sanctioned the modification in Regulation 4(ii) of the said Regulation regarding increase in FSI from 3.0 to 4.00 for Residential purposes in 'G' Block of BKC;

And whereas, as per the said Regulation the values of Floor Space Index (FSI) in Bandra-Kurla Complex Notified Area are the values of the aggregate FSI in respect of the total buildable area in a block of plots in the respective zone and the maximum permissible floor space in any plot shall be in accordance with the Architectural Control Drawings for that plot prepared by the Authority;

And whereas, the Government in Urban Development Department vide G.R. No.MRD-3322/CR-83/UD-7 dated 29th August,2022 constituted a High-Level Committee under the Chairmanship of Additional Chief Secretary, Urban Development Department (hereafter referred to as " the said H. L. Committee") to study and submit report on rationalization of premium rates for allotment of Additional FSI on Authority's lands in BKC;

And whereas, the said High-Level Committee held its meetings on 23rd November, 2022, 12th January, 2023 and 12th May, 2023 to deliberate various issues pertaining to the Additional FSI in BKC and submitted the final report to the Government of Maharashtra on 10th July, 2023 wherein the High Level Committee recommended amalgamation of Block 'E' & 'G' and Global FSI 4.0 for the said block to further promote development of International Finance and Business Centre(IFBC) as most of the plots in the said block are allotted and Additional FSI is required for facilitating competitive bidding for development of balance plots and encouraging redevelopment/reconstruction of existing plots through promotional rates of premium;

And whereas, after considering the recommendations of the High Level Committee, in order to promote the development of International Finance and Business Centre in BKC and to bring parity between the developments in BKC and Bruhanmumbai Municipal Corporation Area, Government in Urban Development Department vide notification of even number dated 19/07/2024 has sanctioned a modification proposal in the said Regulations (hereafter referred to as "the said Notification");

And whereas, Government in Urban Development Department has received a letter dated 23/05/2025 from Chief, Town & Country Planning Division, Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) wherein it is stated that, *CREDAI- MCHI vide its letter dt.30/01/2025 & M/s. BKC Property Owners Association vide their letter dt.23/04/2025 have requested MMRDA for relaxation of 50% parking requirement for consumption of additional built up area in BKC admissible as per the State Government's Notification dated 19/07/2024. In this regard, MMRDA is of the view that the hardships faced by the lessee's/ property owners in BKC & various aspects as mentioned in CREDAI-MCHI letter dt.30/01/2025 & M/s. BKC Property Owners Association's letter dt.23/04/2025 require due consideration to promote consumption of Additional BUA in BKC."* and has requested the Government to give necessary directions in respect of the above said request regarding concession in parking;

And whereas, in view of the above said facts and request of MMRDA, the Government in Urban Development Department is of the opinion that in order to make possible the utilization of the additional built up area permissible as per the said notification dated 19/07/2024, it is expedient to modify the said Regulations in the public interest, to add new proviso by new note under Clause (A) of Regulation 4 (ii) of the said Regulations as specifically described in the

Schedule attached herewith (hereinafter referred to as "the Proposed Modification").

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (1AA) of Section 37 of the said Act; and of all other powers enabling it in this behalf, Government hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to the Proposed Modification, as required by clause (a) of sub-section (1AA) of Section 37 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. The Government is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the Proposed Modification mentioned in the Schedule attached herewith may be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette, (hereinafter referred to as "the said period") to the Deputy Director of Town Planning., Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001. Any objections / suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of sub-section (1AA) of Section 37 of the said Act by the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, who is hereby authorised as an "officer" on the behalf of Government to hear objections / suggestions which are received and say of the said Corporation, as the case may be and submit his report to the Government;

Further, the Government hereby issues directives under Section 154(1) of the said Act to MMRDA that, pending sanction to the Proposed Modification under clause (c) of Section 37(1AA) of the said Act by the Government, the Proposed Modification shall come into force forthwith.

This Notice under sub-section (1AA) of Section 37 of the said Act shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in ( Acts/Rules ).

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**( Amar Patil )**
**Under Secretary to Government.**

## SCHEDULE

**Accompaniment to the Government in Urban Development Department Notice No. TPB-4323/C.R.139/2023/UD-11, dated – 20/04/2026.**

---

**New Note (iv) is proposed to be inserted under Clause (A) of Regulation 4(ii) of BKC Notified Area Development Control Regulations as follows:-**

In case additional construction is proposed in the previously developed / under construction buildings in 'E' and 'G' blocks as per additional Built-Up area permissible under this regulation wherein clearly demonstrable hardship is caused in proposing parking area as per the provisions of the Development Control and Promotion Regulations for such additional built-up area, then in such cases, with prior approval of Government, the Metropolitan Commissioner, MMRDA is empowered to grant upto 50% relaxation in the required parking to be provided for such additional built-up area only. Provided that, in any circumstances, the parking area shown while approving the plans before coming into force of notification dated 24/07/2024 shall not be reduced.

**( Amar Patil )**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये सूचनेसह कलम १५४ अन्वये निदेश.
- वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीचे विनियम ४(ii) मधील खंड (A) मधील प्रस्तावित फेरबदलाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- २०/०४/२०२६.**

## सूचना

**क्र. टिपीबी-४३२३/प्र.क्र.१३९/२०२३/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०७ मार्च,१९७७ रोजीच्या अधिसूचना क्र. बीकेआर—१९७७/२६२/युडी-५ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी (ज्याचा उल्लेख यापुढे "वांद्रे-कुर्ला संकुल" असा केला आहे) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अनुसार स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण (ज्याचा उल्लेख यापुढे "प्राधिकरण" असा केला आहे) म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा केला आहे) च्या कलम ४०, पोट कलम (१)(क) अन्वये नियुक्ती केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०९ एप्रिल,१९७९ रोजीच्या अधिसूचना क्र. बीकेआर—१९७७/२६२/युडी-५ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ४०, पोट कलम,(3) खंड (डी) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलासाठी प्राधिकरणाने सादर केलेल्या नियोजन प्रस्तावास तसेच सदर क्षेत्रासाठी लागू करावयाच्या विकास नियंत्रण नियमावली,१९७९ यांस मान्यता दिली आहे (ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त नियमावली" असा केला आहे);

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या दिनांक ०२ मे,२००८ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीबी -४३०७/२५९४/प्र.क्र.-६५/२००८/नवि-११ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम,(२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी (जी, जीएन व जी-टेक्स्ट) ब्लॉकचा चटई क्षेत्र निर्देशांक वाणिज्य वापरासाठी २.० ते ४.० पर्यंत व रहिवास वापरासाठी १.५० ते ३.० पर्यंत वाढविण्याच्या अनुषंगाने उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४(ii) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या दिनांक ३१ ऑगस्ट,२००८ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीबी-४३०८/२६१७/प्र.क्र.-२९/२००९/नवि-११ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई' ब्लॉकचा चटई क्षेत्र निर्देशांक (सीआरझेड क्षेत्र वगळून) वाणिज्य वापरासाठी २.० ते ४.० पर्यंत व रहिवास वापरासाठी १.५० ते ३.० पर्यंत वाढविण्याच्या अनुषंगाने उक्त नियमावलीच्या विनियम क्र.४(ii) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या दिनांक २३ ऑगस्ट,२०१५ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीबी -४३१३/२४४/प्र.क्र.-१५८/१३/नवि-११ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम, (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉकमधील रहिवास वापरासाठी

चटई क्षेत्र निर्देशांक ३.० ते ४.० पर्यंत वाढविण्याच्या अनुषंगाने उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४(ii) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीच्या विनियम क्र. ४(ii) अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलातील चटई क्षेत्र निर्देशांक (Aggregate FSI) हा संबंधित जमीन वापराच्या एकूण विकासयोग्य क्षेत्रासाठी लागू असून निव्वळ भूखंडावरील कमाल चटई क्षेत्र निर्देशांक हा प्राधिकरणाच्या वास्तुशास्त्रीय नियंत्रणानुसार लागू राहील असे नमूद केले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाच्या दिनांक २९ ऑगस्ट,२०२२ रोजीच्या शासन निर्णय क्र.एमआरडी-३३२२/प्र.क्र.८३/नवि-७ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाच्या भूखंडावर अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक अधिमुल्याचे उचित सुसुत्रीकरण करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर उच्चस्तरीय समितीने दि. २३ नोव्हेंबर,२०२२, दि.१२ जानेवारी,२०२३ व दि.१२ मे,२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाच्या भूखंडावरील अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक वाटपाबाबतच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करून समितीचा अहवाल महाराष्ट्र शासनास दि. १० जुलै,२०२३ रोजी सादर केला आहे ज्यामध्ये समितीने वांद्रे-कुर्ला संकुलातील उक्त ब्लॉकमधील बहुतांश भूखंडाचे वाटप झाले असल्याने उर्वरित भूखंडावर शिल्लक बांधकाम क्षेत्र वापरण्यासाठी व अस्तित्वातील इमारतींवर तसेच इमारतींच्या पुनर्विकासासाठी /पुनर्बांधणीसाठी अतिरीक्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध करून उक्त ब्लॉकमधील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र ( International Finance and Business Centre)/वित्तीय व्यापार क्षेत्र (Financial Business Area) चा जलदगतीने विकास करण्याच्या अनुषंगाने उक्त ब्लॉकचे एकत्रीकरण करुन संपूर्ण क्षेत्रावर (Gross plot Area) '४.०' ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करून याद्वारे उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त बांधकाम क्षेत्राच्या वाटपासाठी प्रोत्साहनात्मक दर लागू करण्याची शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी विचारात घेऊन, वांद्रे-कुर्ला संकुलातील उक्त ब्लॉकमधील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्राचा जलदगतीने विकास होऊन जास्तीत जास्त कार्यालये, निवासी सदनिका व इतर सोयी सुविधा यांच्या मार्फत रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी तसेच वांद्रे-कुर्ला संकुल व बृहन्मुंबई महापालिकेतील इतर क्षेत्रांमधील विकासांमध्ये समानता राहण्याच्या दृष्टीकोनातून उक्त नियमावलीमध्ये फ़ेरबदल करण्यात आला असून, सदर फ़ेबदलास शासन नगर विकास विभागाकडील दि.१९/०७/२०२४ रोजीचे अधिसूचनेद्वारे मंजूरी देण्यात आली आहे (ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त अधिसूचना" असा केला आहे);

आणि ज्याअर्थी, प्रमुख, टाऊन ॲण्ड कंन्ट्री प्लानिंग डिव्हिजन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडील दिनांक २३/०५/२०२५ रोजीचे पत्र शासन नगर विकास विभागास प्राप्त झाले असून, सदर पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, "*CREDAI-MCHI यांनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजीचे तसेच BKC Property Owners Association यांनी दिनांक २३/०४/२०२५ रोजीचे एमएमआरडीए ला सादर केलेल्या पत्रांद्वारे राज्य शासनाच्या दिनांक १९/०७/२०२४ च्या अधिसूचनेनुसार बीकेसी येथे अनुज्ञेय असलेल्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या पार्किंगचे प्रमाणात ५०% सवलत देण्याबाबत विनंती केली आहे. यासंदर्भात, एमएमआरडीएचे मत असे आहे की, बीकेसीमधील भाडेकरू/मालमत्ता धारकांना भेडसावणाऱ्या अडी-अडचणी तसेच CREDAI-MCHI यांचे दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या पत्रामध्ये व BKC Property Owners Association यांचेकडील दिनांक २३/०४/२०२५ रोजीच्या वर नमूद पत्रांमध्ये नमूद केलेले विविध मुद्दे विचारात घेणे आवश्यक असून, बीकेसीमधील अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी याचा विचार करणे*

*आवश्यक आहे.*" असे नमूद केले असून, पार्किंग सवलती संदर्भातील वरील विनंतीबाबत शासनाने योग्य ते निर्देश देणेबाबत, एमएमआरडीएने विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, वर नमूद वस्तुस्थिती व एमएमआरडीएची विनंती विचारात घेता, उक्त अधिसूचना दि.१९/०७/२०२४ नुसार अनुज्ञेय असलेल्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचा वापर शक्य होण्याच्या दृष्टीने, त्यानुषंगाने सार्वजनिक हिताचे दृष्टिने उक्त नियमावलीचे विनियम ४(ii) मधील खंड (A) मध्ये नवीन तरतूद अंतर्भूत करण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार उक्त नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे (ज्याचा उल्लेख यापुढे "प्रस्तावित फ़ेरबदल" असा केला आहे);

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड(क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिध्द करीत आहे. शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/ सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदर प्राप्त हरकती / सूचनांवर सुनावणी देवून तसेच लागू असेल त्याप्रमाणे उक्त महानगरपालिकेचे म्हणणे घेवून त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना शासनाचे वतीने "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४(१) अन्वये एमएमआरडीला निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल.

उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा /नियम ) या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32.

(अमर पाटील )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट

(शासन नगर विकास विभाग सूचना क्र.टिपीबी-४३२३/प्र.क्र.१३९/२०२३/नवि-११,
दिनांक- २०/०४/२०२६ सोबतचे परिशिष्ट)

**New Note (iv) is proposed to be inserted under Clause (A) of Regulation 4(ii) of BKC Notified Area Development Control Regulations as follows:-**

In case additional construction is proposed in the previously developed / under construction buildings in 'E' and 'G' blocks as per additional Built-Up area permissible under this regulation wherein clearly demonstrable hardship is caused in proposing parking area as per the provisions of the Development Control and Promotion Regulations for such additional built-up area, then in such cases, with prior approval of Government, the Metropolitan Commissioner, MMRDA is empowered to grant upto 50% relaxation in the required parking to be provided for such additional built-up area only. Provided that, in any circumstances, the parking area shown while approving the plans before coming into force of notification dated 24/07/2024 shall not be reduced.

(अमर पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन